**महाराष्ट्र शासन**

सार्वजनिक आरोग्य विभाग

गो.ते. रुग्णालय संकुल इमारत,

१० मजला, मुंबई ४००००१

क्रमांक: कोरोना- २०२१/प्र.क्र.३६६/आ-५,

दिनांक : २८ ऑक्टोबर, २०२१.

संदर्भ :

१) साथरोग अधिनियम, १८९७.

२) आपत्ती निवारण कायदा, २००५.

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन समक्रमांक दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ चे आदेश.

४) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन समक्रमांक दिनांक २६ ऑक्टोबर, २०२१ चे आदेश.

## शासन आदेश

### ब्रेक द चेन अंतर्गत - राज्यातील सर्व शासकीय / निमशासकीय व खाजगी व औद्योगिक आस्थापनांमध्ये मास्क अनिवार्य वापरावयाच्या दंड आकारणी शुल्काबाबत

राज्यात साथरोग प्रतिबंध अधिनियम,१८९७ व आपत्ती निवारण कायदा, २००५ ची अंमलबजावणी सुरु आहे.

राज्यातील सर्व शासकिय, निमशासकिय व खाजगी कार्यालये तसेच औद्योगिक आस्थापना १०० टक्के उपस्थिती क्षमतेने सुरू झाली असल्याने कोविड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून पंचसुत्रीचा (टेस्ट-ट्रॅक-ट्रीट-लसीकरण-कोविड ॲप्रोप्रियट बिहेविअर) अवलंब करणे सर्व अधिकारी/कर्मचा-यांच्या हितावह असल्याने मास्कचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे.

संदर्भ क्र. ४ येथील शासन आदेशामधील मुद्दा क्र. ५ मध्ये कार्यालय व कार्यालयाच्या आवारात विनामास्क आढळून येणाऱ्या अभ्यागत / अधिकारी / कर्मचारी यांना दंड आकारणी बाबत नमुद केलेले आहे. सदर दंडाची रक्कम रु. २००/- (रुपये दोनशे फक्त) इतकी निश्चित करण्यात आलेली आहे. सक्षम प्राधिकारी सदर दंडाची रक्कम संबंधित कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकाऱ्याकडे जमा करेल व आहरण व संवितरण अधिकारी सदर दंडाची रक्कम खाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखालील असलेल्या जमा सांकेतांकाखाली भरणा करेल.

E:\पत्रनीकर\ब्रेक द चेन (मास्क वापर).docx

| मराठी | English |
|---|---|
| महसूल जमा<br>(सी) इतर कराव्यतिरिक्त महसूल<br>(एक) सर्वसाधारण सेवा<br>००७-इतर प्रशासनिक सेवा<br>८०० इतर जमा रक्कम | Revenue Receipt<br>(c) other non-Tax Revenue<br>(1) General services<br>0070 -Other Administrative Services<br>800 Other Receipts |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्रदीप व्यास 28-10-2024
(डॉ. प्रदीप व्यास)
अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण), मंत्रालय, मुंबई,
५) मा. राज्यमंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण), मंत्रालय, मुंबई.
६) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई. (सर्व)
८) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
९) मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०) सर्व सह सचिव / उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव यांचे स्वीय सहाय्यक, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) आयुक्त (आरोग्य सेवा) व अभियान संचालक, एनएचएम, मुंबई.
१४) धर्मदाय आयुक्त एम. एस. मुंबई.
१५) मुख्य कार्यकारी अधिकारी राज्य आरोग्य विमा संस्था, वरळी, मुंबई.
१६) सर्व विभागीय आयुक्त.
१७) सर्व जिल्हाधिकारी.
१८) सर्व महानगरपालिका आयुक्त,
१९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
२०) संचालक, आरोग्य सेवा मुंबई / पुणे.
२१) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा
२२) सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
२३) उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व).
२४) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व),
२५) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व).
२६) जिल्हा हिवताप अधिकारी (सर्व).
२७) निवड नस्ती (आ-५),

E:\पत्रनीकर\ब्रेक द चेन (मास्क वापर).docx